# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 19 June 2025

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १९ जून २०२५ सकाळी ७.१० मि.**

****

- येत्या १५ ऑगस्टपासून वार्षिक फास्टॅग पास सुरू करण्याचा केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाचा निर्णय
- पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठीची हिंदीची सक्ती रद्द- राज्य सरकारकडून शुद्धीपत्रक जारी
- संत तुकाराम महाराज तसंच संत एकनाथ महाराजांच्या पालखीचं पंढरपूरकडे प्रस्थान
- अरण्यऋषी पद्मश्री मारुती चितमपल्ली कालवश

आणि

- नांदेडचे डॉ सुरेश सावंत यांना साहित्य अकादमीचा बाल साहित्य पुरस्कार जाहीर

****

येत्या १५ ऑगस्टपासून वार्षिक फास्टॅग पास सुरू करायचा निर्णय, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं घेतला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काल समाज माध्यमावरच्या संदेशाद्वारे ही माहिती दिली. तीन हजार रुपये किंमतीचा हा पास, एक वर्ष कालावधी किंवा २०० फेऱ्या यापैकी आधी संपणाऱ्या मुदतीसाठी असेल. राष्ट्रीय महामार्गाशिवाय इतर मार्गांवर ही सुविधा मिळणार नाही, असं गडकरी यांनी स्पष्ट केलं.

****

राज्य शिक्षण मंडळाच्या मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी हिंदी भाषा ही तृतीय भाषा म्हणून अनिवार्य नसल्याचं राज्य सरकारनं स्पष्ट केलं आहे. यासंदर्भात सरकारने शुद्धीपत्रक जारी केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात याबाबत माहिती दिली, ते म्हणाले...

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

आषाढी वारीसाठी देहू इथून संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्याने काल पंढरपूरकडे प्रस्थान केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पादुकांचं पूजन झाल्यानंतर पालखी मार्गस्थ झाली. देहू इथं उभारलेल्या संतसृष्टीचं तसंच टाळगाव इथं उभारलेल्या जगद्गुरू संत तुकाराम महाराज संतपीठाच्या कलादालनाचं लोकार्पण, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झालं.

**

पैठण इथल्या संत एकनाथ महाराजांच्या पालखीनेही काल आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रयाण केलं. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यासह परिसरातल्या अनेक लहान मोठ्या दिंड्या आणि शेकडो वारकरी या पालखी सोहळ्यात सहभागी झाले आहेत.

****

आषाढी वारी मार्गात कायमस्वरूपी सोयी–सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे–बोर्डीकर यांनी दिल्या आहेत. त्या काल याबाबतच्या आढावा बैठकीत बोलत होत्या. “स्वच्छ वारी, सुरक्षित वारी, भक्तीमय वारी” करण्याचं आवाहन बोर्डीकर यांनी यावेळी केलं.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना महिला नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करता येणार आहे. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी ही माहिती दिली. शासनाच्या आठ मार्च २०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार, आवश्यक निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांची नोंदणी प्रक्रिया केली जाईल, असंही पाटील यांनी सांगितलं.

****

अरण्यऋषी पद्मश्री मारुती चितमपल्ली यांचं काल सोलापूर इथं निधन झालं, ते ९४ वर्षांचे होते. महाराष्ट्र सरकारच्या वन विभागात ३६ वर्षांहून अधिक काळ सेवा केलेल्या चितमपल्ली यांचं, नागझिरा तसंच मेळघाटात विस्थापित वन्यजीवांसाठी अनाथाश्रम उभारण्यात मोठं योगदान आहे. जंगलांचं अनुभवकथन असलेली त्यांची अनेक पुस्तकं प्रसिद्ध आहेत, यामध्ये "चकवा चांदणं" या आत्मचरित्रासह निलवंती, जंगलाचं देणं, घरट्या पलिकडे, पक्षी जाय दिगंतरा, रातवा, पाखरमाया आदी पुस्तकांचा समावेश आहे. २००६ मध्ये सोलापूर इथं झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद त्यांनी भूषवलं होतं. चितमपल्ली यांना राज्य सरकारच्या विं दा करंदीकर जीवनगौरव पुरस्कारासह विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं होतं. पद्मश्री या नागरी सन्मानानेही नुकतंच त्यांना गौरवण्यात आलं होतं.

चितमपल्ली यांच्या पार्थिव देहावर आज सोलापूर इथं अंत्यसंस्कार होणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चित्तमपल्ली यांच्या निधनाबद्दल दु:ख व्यक्त केलं आहे.

****

साहित्य अकादमीनं वार्षिक बाल साहित्य पुरस्कार आणि युवा पुरस्कारांची काल घोषणा केली. मराठी भाषेसाठी नांदेडचे डॉ सुरेश सावंत यांच्या आभाळमाया या कवितासंग्रहाला बाल साहित्य पुरस्कार, तर प्रदीप कोकरे यांच्या खोल खोल दुष्काळ डोळे या कादंबरीला, युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. सन्मानचिन्ह आणि ५० हजार रुपये रोख असं या पुरस्कारांचं स्वरुप आहे.

****

केंद्र सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या कारकिर्दीत आंतरराष्ट्रीय योग दिवस हा एक मैलाचा दगड ठरला आहे. परवा शनिवारी आपण ११ वा आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करत आहोत. भारतीय योगपद्धतीचा संक्षिप्त वेध घेणारा हा वृत्तांत…

> ***''योग साधनेचा इतिहास भारताच्या प्राचीन संस्कृतीत खोलवर रुजलेला आहे. सिंधू-सरस्वती खोऱ्याच्या संस्कृतीच्या अगदी प्रारंभीच्या काळात, एका आध्यात्मिक पद्धतीच्या रूपात सुरुवात झालेली योग साधना हळूहळू आत्म-साक्षात्काराच्या दिशेने एक शिस्तबद्ध मार्ग म्हणून आणि त्यानंतर एका समृद्ध विद्याशाखेत विकसित झाली. कालांतराने ही योग पद्धती वेद, उपनिषद आणि नंतर पतंजलीच्या योगसूत्रांमधून प्रवाहित झाली.***

*महाभारतातल्या योगाच्या सखोल संदर्भांपासून ते स्वामी विवेकानंद आणि बी.के.एस. अय्यंगार यांच्यासारख्या महान गुरुंनी १९ व्या आणि २० व्या शतकात केलेल्या पुनरुज्जीवनापर्यंत, योगसाधनेचा हा प्रवास एका प्राचीन परंपरेपासून जागतिक जीवनशैलीपर्यंत विकसित झाला आहे.*

*२०१४ मध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या सभेला संबोधित करताना २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. प्रचंड बहुमताने हा प्रस्ताव मंजूर झाला, आणि २१ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जाऊ लागला.*

*यंदा आपण ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत आहोत, "एक पृथ्वी- एक आरोग्यासाठी योग" ही यंदाच्या योगदिनाची संकल्पना असून, ती एकता आणि कल्याणाचा संदेश देते. धर्म, वंश किंवा राष्ट्रीयत्व कोणतंही असो; योग साधना सर्वांनाच निरोगी, संतुलित आणि अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग दाखवते."*

योगदिनाच्या पार्श्वभूमीवर आकाशवाणी आपल्या श्रोत्यांसाठी दररोज एका आसनाविषयी माहिती घेऊन येत आहे. आज आपण, छत्रपती संभाजीनगर इथले योगशिक्षक डॉ हेमंत झिळे यांनी दिलेली, हलासनाची माहिती जाणून घेऊ...

**बाईट – डॉ हेमंत झिळे, योगशिक्षक**

****

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये योगाभ्यास सत्रांसह वृक्षारोपण, स्वच्छता मोहीम आदी उपक्रम राबवण्यात येणार आहेत. विभागातल्या सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी नागरिकांना या उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन केलं आहे.

****

देशभरातल्या १२ विद्यार्थ्यांशी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नुकताच संवाद साधला. छत्रपती संभाजीनगर महापालिकेच्या इंदिरा नगर बायजीपुरा शाळेतली दहावीची विद्यार्थिनी अंजली गायकवाड या कार्यक्रमात सहभागी झाली होती. अंजलीने आपल्या रोबोटिक्स प्रकल्पाचं शिक्षणमंत्र्यांसमोर सविस्तर सादरीकरण केलं. आपला हा अनुभव तिने या शब्दांत मांडला...

**बाईट – अंजली गायकवाड**

****

ऊसतोड महिला कामगारांची ऊसतोडणीस जाण्यापूर्वी तसंच तोडणी वरून परत आल्यानंतर अशा दोन्ही वेळा आरोग्य तपासणी करण्याचे निर्देश, अनुसूचित जाती जमाती समितीचे सदस्य गोरख लोखंडे यांनी दिले आहेत. ते काल बीड इथं बोलत होते. ऊसतोड कामगार महिलांचा अवैधरित्या गर्भपात केल्याचं आढळल्यास गुन्हा दाखल करण्याच्या सूचनाही लोखंडे यांनी दिल्या.

****

मोसमी पावसाने राज्यात पुन्हा जोर धरला आहे. छत्रपती संभाजीनगर परिसरात पहाटेपासून पावसाच्या हलक्या सरी कोसळत आहेत. येत्या दोन दिवसात, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

****